# Washim District Police

**Nature of Work** :- Nirbhaya Pathak

**Police Station** :- Nirbhaya Pathak

**Date of Good Work done** :- 05/01/2023

**Brief of the work done :-**

'निर्भया_पथका' ची कारवाई.

## 'निर्भया पथक' ॲक्शन मोडवर

### कॉफी शॉपची झाडाझडती; पेट्रोलिंगमुळे टवाळखोरांवर वचक

पुण्यनगरी IMPACT

**वाशीम, दि. ३ (प्रतिनिधी)**

**जिल्ह्यातील प्रमुख शहरांतील प्रमुख चौक, शाळा, महाविद्यालय परिसरासह गावखेड्यात रोडरोमियोंचा उच्छाद वाढला. शिवाय निर्जन रस्त्यांच्या कडेला अल्पवयीनांच्या रासलिला बिनबोभाट सुरु असल्याचे दिसून येतात. यावर अंकुश ठेवण्याची जबाबदारी असलेले पथक निष्क्रिय झाल्याची बाब दै. पुण्यनगरीने १ जानेवारीच्या अंकात ' जिल्ह्यात 'निर्भया पथक ' नावालाच ' या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करुन उजागर केली. या वृत्ताने जागी झालेल्या निर्भया पथकाने ॲक्शन मोडवर येत ३ जानेवारी रोजी शहरातील कॉफी शॉपची झाडाझडती घेत कारवाईचा बडगा उगारल्याने वाशीमकर भयमुक्त झाले असून पालकांमधून समाधान व्यक्त केल्या जात आहे.**



पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण, टिव्ही मोबाईलचा अनावश्यक वापर व कामाच्या व्यस्ततेमुळे पालकांचे होणारे दुर्लक्ष आदि कारणाने आजची तरुणाई भरकटली आहे. परिणामी, लहानवयातच शारिरीक आकर्षण वाढीस लागून अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य उध्दस्त होत आहे. महानगरांमध्ये चालणारा हा प्रकार वाशीम सारख्या लहान व मागास जिल्ह्यातही वाढीस लागला. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या वाशीम शहरासोबतच प्रत्येक प्रमुख शहरांमधील चौकाचौकात तथा शाळा, महाविद्यालयाच्या परिसरात या रोमीयोंचा धुडगुस वाढल्याचा अनेकांनी अनुभव घेतला. सज्ञान महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह शाळकरी अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या रासलीला बिनबोभाट सुरु झाल्याने निर्जन ठिकाणी अशी जोडपी सर्रास दिसून येवू लागली. कामाच्या व्यस्ततेमुळे पालकांना याकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नसल्याने अनेक अप्रिय घटना देखील घडल्या आहेत. कुणाचा अंकुश नसल्याने निर्जनस्थळे, कॉफी शॉप, मंदिर या परिसरात रोडरोमियोंच्या रासलिला बिनदिक्कतपणे सुरु असल्याचे भयावह चित्र निर्माण झाले. या प्रकाराला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने निर्भया पथक कार्यान्वित केले. परंतू सदर पथकच कोमात गेल्याने तरुणाई बेफाम झाली. शाळा, महाविद्यालय परिसरात टवाळखोरांकडून होणाऱ्या त्रासामुळे शिक्षणासाठी येणाऱ्या युवतींमध्ये भीतीचे तर पाल्याच्या सुरक्षेच्या काळजीने पालकांना ग्रासले होते. या प्रकाराला आळा घालून विद्यार्थीनी, महिला व पालकांना भयमुक्त करण्यासाठी निर्भयाच्या कारवायाची गरज असल्याचे वृत्त झळकताच मंगळवारी या पथकाने कारवाईचा बडगा उगारला. त्यानुसार शहर पोलीस व निभर्या पथकातील कर्मचाऱ्यांनी संयुक्तरित्या शहरातील कॉफी शॉपची झाडाझडती घेत याठिकाणी आढळलेल्या जोडप्यांना ताब्यात घेत प्रतिबंधात्मक कारवाई केली. या प्रकाराची माहिती या जोडप्यांच्या कुटुंबियांना देवून सोडून देण्यात आले. निर्भया पथक ॲक्शन मोडवर आल्याने रोडरोमियोंचे धाबे दणाणले आहेत. या कारवाईमुळे भयमुक्त झालेल्या वाशिमकरांमधून समाधान व्यक्त केल्या जात असून कारवायांमध्ये सातत्य असावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**अशी केल्या जाते कारवाई**

शहरातील कमी वर्दळीची ठिकाणे, मंदीर परिसर, बसस्थानक यासह इतरत्र आक्षेपार्ह्य स्थितीत आढळून येणारे तसेच मुली व महिलांची छेड काढणाऱ्यांना पोलीस स्टेशनमध्ये आणून त्यांचे विरुध्द मुंबई पोलीस ॲक्ट ११०,११७ त र अल्पवयीन असल्यास सीआपीसी ॲक्ट १४७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते.यानंतर संबंधितांच्या पालकांना बोलावनू त्यांच्या ताब्यात देण्यात येते.